# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/जिपपस-२०२५/प्र.क्र.३९/का-७,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० नोव्हेंबर २०२५

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय:- नगर परिषदा / नगर पंचायती व जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूक-२०२५
मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांच्या नेमणुकीबाबत व त्यांच्या कामकाजाबाबत मार्गदर्शक सूचना

महोदय,

आपणास ज्ञात आहे की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक / पोट निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची असून पर्यायाने ती आयोगाच्यावतीने जिल्हाधिकारी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून विभागीय आयुक्तांची आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये सर्व स्तरावर प्रामुख्याने निवडणूक निर्णय अधिकारी व मतदान केंद्राध्यक्ष यांचे काम नियमानुसार होत आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी गेल्या अनेक निवडणुकांपासून स्वतंत्र निवडणूक निरीक्षक नेमण्याची पध्दत राज्य निवडणूक आयोगाने सुरु केलेली आहे.

३. मतदारांना प्रभावित करण्यासाठी राजकीय पक्ष व उमेदवार अनेक कल्पक योजना हाती घेऊन पैसा, मद्य व इतर वस्तूंचे वाटप करतात असे काही निवडणुकांमध्ये भारत निवडणूक आयोगाच्या लक्षात

आल्यावर त्यांनी त्यांच्यावर बंधन आणण्याच्या दृष्टीने अनेक उपाययोजना सुरु केल्या आहेत. उदा. खर्चासाठी विशेष निरीक्षकांची नियुक्ती, प्रत्येक पोलीस स्टेशनवर भरारी पथक (Flying Squad), व्हिडिओग्राफी, इत्यादी.

४. भारत निवडणूक आयोगाच्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये देखील खर्चावर नियंत्रण ठेवणे व मतदारांना देण्यात येणाऱ्या प्रलोभनास आळा बसविणे आवश्यक आहे.

५. वरील बाबींचा (खर्च, प्रलोभन, एकसदस्यीय / बहुसदस्यीय प्रभाग पध्दती व नगराध्यक्ष थेट निवडणूक इत्यादी) विचार करुन इत्यादी नगर परिषद / नगर पंचायत / जिल्हा परिषद / पंचायत समितीच्या निवडणुकांकरिता निवडणूक निरीक्षकांबाबत एकत्रित सुधारित आदेश निर्गमित करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

## आदेश

६. राज्यात पहिल्यांदाच जवळपास सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. त्यामुळे उपलब्ध अधिकारी तसेच निवडणुकीचे विविध टप्पे इत्यादी बाबींचा विचार करून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

(i) विभागीय आयुक्त यांनी जिल्हा परिषद / पंचायत समित्यांच्या तसेच नगर परिषद / नगर पंचायत निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने स्वतंत्र निवडणूक निरीक्षक म्हणून इतर जिल्हयात कार्यरत असलेल्या खालील अधिकाऱ्यांची नेमणूक करावी.

(ii) ज्या ठिकाणी उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी निवडणूक निर्णय अधिकारी आहेत त्या ठिकाणी अपर जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालयात अपर जिल्हाधिकारी ( निवडश्रेणी ) किंवा आवश्यकता भासल्यास इतर जिल्ह्यात कार्यरत असलेले जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवडणूक निरीक्षक नेमावेत.

त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी तहसिलदार संवर्गातील अधिकारी निवडणूक निर्णय अधिकारी आहेत त्या ठिकाणी शक्यतो उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी यांना निवडणूक निरीक्षक नेमता येईल.

(iii) राज्यात विभागीय आयुक्त कार्यालयात व जिल्हयात एकूण ६२ अपर जिल्हाधिकारी यांची पदे मंजूर असून, ३४ जिल्ह्यांमध्ये मुख्य कार्यकारी जि.प. अधिकारी कार्यरत आहेत. मात्र, अधिकाऱ्यांची संख्या व स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या विचारात घेता, प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला स्वतंत्र निवडणूक निरीक्षक देणे शक्य होणार नाही. त्यामुळे ज्या जिल्ह्यात १० पेक्षा जास्त नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या निवडणुका आहेत त्या जिल्ह्यात २ ते ३ नगरपरिषदा मिळून एक निवडणूक निरीक्षक नेमावेत. मात्र, निवडणूक निरीक्षक यांना सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रामुख्याने नामनिर्देशनपत्राच्या छाननी, मतदानाच्या दिवशी व मतमोजणी या ठिकाणी एकाच वेळी हजर राहणे शक्य होणार नसल्यामुळे त्यांनी नेमक्या कोणत्या ठिकाणी उपरोक्त प्रक्रियेच्या दरम्यान उपस्थित रहावे हे निवडणूक निरीक्षक यांनी स्वतः ठरवावे. मात्र संबंधित निवडणूक निरीक्षकाला नेमून देण्यात आलेल्या इतर ठिकाणी देखील त्यांनी उपरोक्त प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भेट देऊन, झालेल्या कामाचा आढावा घ्यावा.

(iv) जिल्हा परिषद व पंचायत समिती साठी प्रत्येक जिल्ह्यात २ निवडणूक निरीक्षक नेमण्यात यावे. मात्र दुर्गम जिल्ह्यासाठी ३ निवडणूक निरीक्षक नेमण्याची मुभा विभागीय आयुक्त यांना राहील. मात्र, निवडणूक निरीक्षक यांना सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रामुख्याने नामनिर्देशनपत्राच्या छाननी, मतदानाच्या दिवशी व मतमोजणी या ठिकाणी एकाच वेळी हजर राहणे शक्य होणार नसल्यामुळे त्यांनी नेमक्या कोणत्या ठिकाणी उपरोक्त प्रक्रियेच्या दरम्यान उपस्थित रहावे हे निवडणूक निरीक्षक यांनी स्वतः ठरवावे. मात्र संबंधित निवडणूक निरीक्षकाला नेमून देण्यात आलेल्या इतर ठिकाणी देखील त्यांनी उपरोक्त प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भेट देऊन, झालेल्या कामाचा आढावा घ्यावा.

(v) प्रामाणिक, संशयातीत सचोटी व निवडणुकीचा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नेमणूक करावी.

८. सर्व निवडणूक निरीक्षकांनी त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रात भेटी देऊन सर्व आवश्यक बाबींवर लक्ष ठेवावे. उदा :-

८.१ सर्व व्यवस्था -

(i) मतदान केंद्राबाबतचे राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का.५, दि.२६/०६/२०२५ व दि.२९/०८/२०२५ मधील निकषानुसार मतदान केंद्राची निश्चिती करण्यात आली आहे किंवा कसे हे तपासणे,

(ii) सर्व मतदान केंद्रे सुस्थितीत आहेत किंवा कसे हे तपासणे,

(iii) सर्व मतदान केंद्रावर आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे हे तपासणे, उदा. सुव्यवस्थित खोल्या, शौचालय, पिण्याचे पाण्याची सोय, वीज, रॅम्प, इत्यादी.

(v) निवडणूक प्रक्रिया योग्यरितीने पार पाडण्यासाठी आवश्यक (राखीव कर्मचाऱ्यांसह) अधिकारी/कर्मचारी वर्ग नेमण्यात आला आहे किंवा कसे हे तपासणे,

(vi) आवश्यक वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे किंवा कसे हे तपासणे,

(vii) संबंधित निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व अधिकारी /कर्मचारी यांना योग्य ते प्रशिक्षण देण्यात आले आहे किंवा कसे हे तपासणे,

(viii) सर्व संबंधित विभाग व यंत्रणा यांच्या सोबत योग्य तो समन्वय साधण्यात आला आहे किंवा कसे हे तपासणे, (उदा. गृह विभाग, उत्पादन शुल्क विभाग, आयकर विभाग, वस्तू आणि सेवा कर विभाग, बँक, विद्यापीठे, प्रादेशिक परिवहन, इत्यादी.)

(ix) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे ठेवण्यासाठी स्ट्राँग रुमची व्यवस्था व मत मोजणीकरिता योग्य ती व्यवस्था करण्यात आली आहे किंवा कसे हे तपासणे.

८.२ आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसोबत खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंचे वाटप इत्यादींवर अंकुश ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे किंवा कसे, उदा.

(i) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे किंवा कसे, तसेच या समितीची बैठक आवश्यकतेप्रमाणे घेण्यात येते किंवा कसे,

(ii) समितीने आवश्यक त्या सर्व विषयावर शास्त्रोक्त आराखडा तयार केला किंवा कसे, उदा :-

(अ) कायदा व सुव्यवस्था राखणे- प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह

(ब) आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे,

(क) मतदारांवर प्रभाव टाकण्याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तुंच्या वाटपावर अंकुश ठेवणे.

(ड) रोख रकमांच्या मोठया व्यवहारावर सर्व संबंधित ठिकाणी उदा. विमानतळ, रेल्वे स्थानक, हॉटेल्स, फार्म हाऊस यांच्यावर नजर ठेवणे.

(ग) राज्य निवडणूक आयोगाचे अधिसूचना दि.०९/१०/२०२५ नुसार पेड न्यूजबाबतच्या समितीच्या कामाचा आढावा घेणे. त्याचबरोबर सोशल मीडिया व इंटरनेट इत्यादींवर लक्ष ठेवणे.

८.३ निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुका होण्यासाठी इतर सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आली आहे किंवा कसे,

८.४ प्रचारासाठी देण्यात येणाऱ्या परवानग्यामध्ये निवडणुकीमधील सर्व पक्ष व उमेदवार यांना एकसमान संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे किंवा कसे, (उदा. स्थानिक केबल, टी.व्ही., रेडिओ, होर्डिंग्ज, वर्तमानपत्रे, इत्यादी)

९. निवडणूक निरीक्षक यांनी त्यांना देण्यात आलेल्या नगर परिषद/नगर पंचायत व जिल्हा परिषद/ पंचायत समिती क्षेत्रामध्ये नामनिर्देशन पत्राची छाननी, प्रचार कालावधीत, मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी भेटी राहून त्याचा अहवाल सोबत जोडलेल्या परिशिष्टांनुसार स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय विभागीय आयुक्त यांना सादर करावा व त्याची एक प्रत राज्य निवडणूक आयोगास ईमेल द्वारे सादर करावी. ( नगर परिषद/नगरपंचायतीकरिता email - sec.council@mah.gov.in ) (जिल्हा परिषद व पंचायत समितीकरिता email - sec.zpps@mah.gov.in ) विभागीय आयुक्तांनी सदर

...6.

अहवाल जतन करून ठेवावेत. भविष्यात आवश्यकता भासल्यास आयोगाकडून त्यांच्याकडे एकत्रितरित्या मागणी करण्यात येईल.

१०. निवडणूक निरीक्षक यांनी स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय केलेल्या कामाचा अहवाल कमीत कमी ३ वेळा संबंधित विभागीय आयुक्त यांना २४ तासात प्राप्त होईल या बेताने सादर करावा व त्याची एक प्रत राज्य निवडणूक आयोगास ईमेल द्वारे सादर करावी. ( नगर परिषद/ नगरपंचायतकरिता email-sec.council@mah.gov.in) (जिल्हा परिषद व पंचायत समितीकरिता email-sec.zpps@mah.gov.in ) सर्व निवडणूक निरीक्षक यांनी द्यावयाच्या अहवालामध्ये एकवाक्यता असावी याकरीता विहित केलेले सोबतचे परिशिष्ट-३ ते ५ मधील नमुन्यात टप्पानिहाय आढावा घेवून, निवडणूक निरीक्षकांनी संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सादर करावा. सदरचे परिशिष्टांव्यतिरीक्त अतिरिक्त माहिती द्यावयाची झाल्यास ती वेगळ्या पृष्ठावर मुद्देनिहाय सादर करावी

११. निवडणूक निरीक्षक यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना परिशिष्ट-१ प्रमाणे राहतील. तसेच निवडणूक निरीक्षकांकरिता जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावयाची माहितीची तपासणी सूची सोबत जोडली आहे.

१२. निवडणूक निरीक्षक हे ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालयाचे वाहन (इंधनासहीत) वापरण्यात यावे. निवडणूक निरीक्षक यांचेसाठी संपर्क अधिकारी यांची नेमणूक जिल्हाधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करावी. राहण्याची व अनुषंगिक व्यवस्था संबंधित जिल्हाधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांनी समन्वयाने करावी. तसेच निवडणूक निरीक्षकांना देय होणाऱ्या भत्यांचा खर्च ते सध्या कार्यरत असलेल्या मूळ कार्यालयातून भागविण्यात यावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

१०.११.२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# परिशिष्ट – १

## निवडणूक निरीक्षकांसाठी मार्गदर्शक सूचना

संबंधित निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक रितीने पार पाडण्याची सर्व जबाबदारी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व त्यांच्या अधिनस्त सर्व अधिकाऱ्यांची आहे. मात्र, आवश्यक ती सर्व उपाययोजना जिल्हाधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, नगर परिषदा / नगर पंचायतींचे प्रशासक/ मुख्याधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांकडून केली जाते किंवा नाही. तसेच पक्ष/उमेदवार यांची राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने तपासणी करणे ही मुख्य निवडणूक निरीक्षक / निवडणूक निरीक्षकाची जबाबदारी राहील. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांप्रमाणे निवडणूक निरीक्षकांनी योग्य ती कार्यवाही करावयाची आहे. त्यांना त्यांचे काम योग्यरितीने हाताळता यावे यासाठी त्यांची जबाबदारी खालील प्रमाणे नमूद करण्यात येत आहे:-

(१) निवडणूक निरीक्षकांनी या निवडणुकीशी संबंधित सर्व कायदे, नियम व आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशांचा अभ्यास करावा व त्यांचे पालन होते की नाही, हे तपासावे. जसे की,

- (i) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१
- (ii) महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणूक घेणे) नियम,१९६२
- (iii) महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम,१९६२
- (iv) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ व त्याअंतर्गत निवडणूक नियम, १९६६
- (v) निवडणूक चिन्ह वाटपाबाबतचे दि. ०५/०५/२०२५ रोजीची अधिसूचना
- (vi) आचारसंहितेबाबतचे सुधारीत आदेश दि. ०४ नोव्हेंबर २०२५
- (vii) निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकरिताची माहितीपुस्तिका

(२) आचारसंहितेच्या निदेशांचे पालन राजकीय पक्ष आणि उमेदवार तसेच शासन यंत्रणा आणि अधिकारी यांचेकडून योग्य प्रकारे केले जाते किंवा कसे तसेच आयोगाच्या निदेशानुसार केली आहे किंवा कसे हे तपासणे:-

(३) संबंधित जिल्हाधिकारी आणि मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी राजकीय पक्षांच्या बैठका घेतल्या आहेत किंवा कसे हे तपासणे,

(४) नगर परिषदा/नगर पंचायती/जिल्हा परिषद/पंचायत समिती क्षेत्रात आचारसंहिता कालावधीत अवैध दारु वाटप होणार नाही याकरिता पर्याप्त उपाययोजना केली आहे किंवा कसे हे तपासणे,

(५) नगर परिषदा/नगर पंचायती/जिल्हा परिषद/पंचायत समित्यांची सर्व माहिती (उदा. हद्दी, प्रभाग, राजकीय परिस्थिती, मतदान केंद्रे, संवेदनशील मतदान केंद्रे , कायदा व सुव्यवस्था, दारुबंदी, निवडणूक साहित्य इत्यादी) निवडणूक निरीक्षकांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करुन व प्रत्यक्ष भेटी देऊन समजवून घ्यावी.

(६) या निवडणुकीमध्ये संगणक प्रणालीचा योग्य तो वापर करण्यात आला आहे किंवा कसे ? हे तपासावे. उदा.-

(i) सर्व नामनिर्देशनपत्र व प्रतिज्ञापत्रे दर दिवशी अपलोड करण्यात आली आहेत किंवा कसे ?

(ii) जिल्हाधिकारी यांनी सर्व मतदान केंद्राध्यक्ष, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी सतत संपर्क साधण्यासाठी योग्य अशी उपाययोजना केली आहे किंवा कसे? (उदा. मोबाईल ॲप्लिकेशन्स, वॉट्स ॲप, एसएमएस, ई-मेल इत्यादी)

(७) राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक-रानिआ-२०१५/एफएलसी/प्र.क्र.५/का.१२, दि.२३/०४/२०१५ च्या सूचनांप्रमाणे शेवटच्या क्षणाची वाट न पाहता उपस्थित असलेल्या सर्व ईव्हीएमची FLC वेळेपूर्वी करण्यात आली आहे किंवा कसे व सर्व ईव्हीएम व्यवस्थितपणे ठेवण्यात आली आहेत किंवा कसे.

(८) मतदान व मतमोजणीसाठी नेमण्यात आलेले अधिकारी/कर्मचारी परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यास त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे किंवा कसे,

(९) कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, पोलीस विभागाकडून आवश्यक ते मनुष्यबळ, दारुबंदी सारख्या उपाययोजना करण्यात आली आहे किंवा कसे, याची तपासणी करावी.

(१०) आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी होते किंवा कसे, याची तपासणी करावी. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींवर लक्ष द्यावे :-

(i) फलक काढणे, इत्यादी

(ii) अनधिकृत बांधकामे

(iii) मतदारांना अप्रत्यक्षपणे प्रलोभन देण्यात आले होते किंवा कसे?

(११) निवडणूक निरीक्षक यांनी त्यांच्या भेटींमध्ये मतदान केंद्रे व त्यावरील उपलब्ध सोयी-सुविधा, ईव्हीएमसाठी तयार करण्यात आलेले स्ट्राँग रुम्स व मतमोजणीचे ठिकाण व त्यावरील सर्व व्यवस्थासुध्दा तपासावी.

(१२) निवडणूक निरीक्षकांना त्यांच्या भेटींच्या वेळी व इतर वेळी काही गैरकृत्ये आढळून आल्यास व त्याचा विपरीत परिणाम निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुकांवर होण्याची शक्यता असेल तर त्याबद्दलची संपूर्ण माहिती त्वरीत संबंधित अधिकारी (जिल्हाधिकारी / पोलीस अधिक्षक) यांच्या निदर्शनास आणावी आणि हे गैरकृत्य थांबविण्याबाबत व गुन्हा नोंदविण्याबाबत त्यांना सूचित करावे. त्यानंतरही गैरकृत्य थांबत नसेल तर त्याचा लेखी अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

(१३) निवडणूक निरीक्षकांनी त्यांच्या भेटींचा अहवाल २४ तासात विभागीय आयुक्तांमार्फत आयोगाकडे सादर करावा.

(१४) एखाद्या प्रभागामध्ये फेर मतदान झाल्यास त्यावेळीसुध्दा वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(१५) निवडणूक निरीक्षकांनी खालील बाबी कटाक्षाने टाळाव्यात :-

(i) निवडणूक निरीक्षकांनी निवडणूक क्षेत्राला भेटी देताना त्यांच्या कुटुंबियांसोबत जाऊ नये.

(ii) निवडणूक निरीक्षकांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयात फेर बदल करु नये. परंतु तो योग्यरित्या काम करतो आहे किंवा कसे याचे निरीक्षण करुन अहवाल सादर करु शकतात.

(iii) निवडणूक निरीक्षकांनी प्रसार माध्यमांशी बोलू नये अथवा मुलाखत देऊ नये.

(iv) अनावश्यक सोयी-सुविधांची मागणी करू नये.

(v) राजकीय पक्षांच्या बैठका आपल्या स्तरावर आयोजित करण्यात येऊ नयेत.

(१५) निवडणुका योग्यरितीने पार पाडल्यावर व सर्व अहवाल आयोगास सादर केल्यावर या आदेशाद्वारे देण्यात आलेली निवडणूक निरीक्षक यांची जबाबदारी पूर्ण होईल.

# परिशिष्ट – २

## तपासणी सूची (Check list)

### निवडणूक निरीक्षकांकरिता जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करुन दयावयाची माहिती

नगर परिषद / नगर पंचायत / जिल्हा परिषद / पंचायत समितीचे नाव :-

१. निवडणुकीशी संबंधित सर्व अधिकाऱ्याची नावे व संपर्क क्रमांक :-

२. नगर परिषद / नगर पंचायतीच्या प्रभागांचे क्षेत्र / जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समितीचे निर्वाचक गणाचे क्षेत्र व नकाशासह तपशील (निवडणूक निर्णय अधिकारीनिहाय)

३. मतदान केंद्रांची एकूण संख्या व त्यापैकी निवडणूक निरीक्षकांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या मतदान केंद्रांची संख्या

४. निवडणुकीकरिता आवश्यक असलेला अधिकारी/कर्मचारीवर्ग यांची संख्या

५. निवडणुकीकरिता आवश्यक असलेले निवडणूक साहित्य-

| | | |
|---|---|---|
| मतदान यंत्रे - | पेपर सील - | पट्टी सील - |
| स्पेशल टॅग - | मार्कर पेन - | काढत्या येणाऱ्या मेमरी- |
| बॅटरी | पितळी सील- | इतर आवश्यक महत्वाचे साहित्य- |

६. मतदान यंत्रांची तपासणी (FLC) -

७. साहित्य वाटप केंद्राची ठिकाण -
संकलन केंद्राचे ठिकाण -

मतमोजणी केंद्राचे ठिकाण -

८. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना याकरिता केलेली कार्यवाही-

९. आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीच्यादृष्टीने केलेली कार्यवाही -

१०. राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या बैठका -

११. उमेदवारांचा निवडणूक खर्च तपासण्याकरिता केलेली उपाययोजना -

१२. मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी इ.करिता आयोजित करण्यात आलेले प्रशिक्षण -

१३. मतपत्रिका छपाईकरिता केलेली व्यवस्था-

१४. स्ट्रॉंग रुम व्यवस्था -

मतदानाचा दिनांक- ..................
नामनिर्देशन पत्र छाननीचा दिनांक - ........

# परिशिष्ट-३

## निवडणूक निरीक्षक यांचा पहिला अहवाल

## (नामनिर्देशनपत्राची छाननी झाल्यानंतर पाठवावयाचा अहवाल)

नगर परिषद/नगर पंचायत/जिल्हा परिषद/पंचायत समितीचे नाव :
निवडणूक निरीक्षकाचे नाव :
भ्रमणध्वनी क्रमांक :
छाननीचा दिनांक:

| अ.क्र. | विषय | निवडणूक निरीक्षकांचा अहवाल |
|---|---|---|
| १ | (i) एकूण किती नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली होती ?<br>(ii) अंतिमरित्या स्विकारण्यात आलेल्या नामनिर्देशनपत्रांची संख्या?<br>(ii) नामनिर्देशनपत्रे शपथपत्रांसह संगणकीय प्रणालीद्वारे अपलोड करण्यात आली किंवा कसे? | |
| २ | (i) छाननीमध्ये किती नामनिर्देशनपत्रे फेटाळण्यात आली ?<br>(ii) नामनिर्देशन नाकारल्याबद्दल लेखी तक्रारी प्राप्त झाल्या असल्यास त्यांची संख्या (निवडणूक निर्णय अधिकारीनिहाय)<br>(ii) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द दाखल झालेल्या अपिलांची संख्या (उपलब्ध असल्यास) | |
| ३ | निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडील नामनिर्देशन पत्रांच्या छाननीबाबत तक्रारी आहेत किंवा कसे ? | |
| ४ | त्या दिनांकास कोणत्या प्रकारच्या अनपेक्षित / आक्षेपार्ह अशा घटना निदर्शनास आल्या किंवा कसे ? आल्या असल्यास त्याचा तपशील | |
| ५ | निवडणूक निरीक्षकांच्या भेटीबद्दल<br>(i) तक्रारी, निवेदने देण्याबाबत सर्वसाधारण जनतेस सूचना देण्यात आली होती किंवा कसे ?<br>(ii) तक्रार निवारण कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे किंवा कसे ?<br>(iii) आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत जनतेकडून प्राप्त तक्रारींचे निवारण होईल याबाबत जनतेस आश्वस्त करण्याकरिता केलेल्या उपाययोजना | |
| ६ | संबंधित यंत्रणांकडून सर्व प्रकारची माहिती घेण्याबाबत तजवीज केलेली आहे किंवा कसे ?<br>(i) आचारसंहिता भंग, पेड न्यूज, मद्यवाटप याबाबत सर्वसाधारण जनतेकडून तक्रारी किंवा सूचना प्राप्त झाल्या किंवा कसे, त्यांची संख्या व तपशील | |

| | | |
|---|---|---|
| | (ii) निवडणूक संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे किंवा कसे?<br>(iii) या समितीच्या किती बैठका घेण्यात आल्या आहेत ?<br>(iv) संनियंत्रण समितीने केलेल्या कार्यवाहीबाबत थोडक्यात माहिती (मुद्दा क्र.९.३)<br>(v) जिल्हास्तरावरील शस्त्रास्त्र छाननी समितीने केलेली कार्यवाही<br>(vi) जाहिरात प्रमाणन /पेड न्यूज तक्रारी संदर्भात समितीची स्थापना करण्यात आली आहे किंवा कसे ?<br>(vii) राजकीय पक्षांची बैठक घेण्यात आली आहे किंवा कसे ?<br>(viii) राजकीय पक्षांना निवडणूक खर्चाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत अवगत करण्यात आले आहे किंवा कसे | |
| ७ | आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी बाबतचे अभिप्राय | |
| ८ | मतदान केंद्राची संख्या व ती पुरेशी आहे का ?<br>(i) मतदान केंद्रावर किमान मुलभूत सुविधा (उदा. वीज, पाणी, शौचालय, सावलीसाठी सोय, इत्यादी) उपलब्ध आहे काय ?<br>(ii) दिव्यांग, गरोदर स्त्रिया, तान्ह्याबाळासह असणाऱ्या स्त्रिया, वयोवृध्द इ. यांचेसाठी पुरेशी सोय उपलब्ध आहे किंवा कसे ? | |

दिनांक:

ठिकाण :

निवडणूक निरीक्षकांची सही

मतदानाचा दिनांक- ..................
प्रचाराचा कालावधी - दि. .......... ते दि. ..........
भेटीचा कालावधी - दि. .......... ते दि. ..........
रात्री मुक्काम दिनांक- ......................

# परिशिष्ट-४

## निवडणूक निरीक्षक यांचा दुसरा अहवाल

( निवडणूक प्रचार संपल्यानंतर मात्र मतदान चमू मतदान केंद्रावर रवाना होण्यापूर्वी पाठवावयाचा अहवाल)

नगर परिषद/नगर पंचायत/जिल्हा परिषद/पंचायत समितीचे नाव :

निवडणूक निरीक्षकाचे नाव :

भ्रमणध्वनी क्रमांक :

छाननीचा दिनांक:

| अ. क्र. | विषय | निवडणूक निरीक्षकांचा अहवाल |
|---|---|---|
| | प्रचार मोहीम | |
| १ | कोणकोणत्या ठिकाणी भेटी दिल्या व त्या ठिकाणी किती वेळ उपस्थित होता ? | |
| २ | तक्रारींचे निवारण करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या ? उदा :-<br>(i) कक्ष<br>(ii) तक्रार निवारण अधिकारी<br>(ii) इतर | |
| ३ | जिल्हाधिकारी स्तरावर पोलीस, दारुबंदी, अधिक्षक, वाहतूक अधिकारी यांच्यासोबत बैठक घेण्यात आली का ? | |
| ४ | स्थानिक पोलीस अधिकारी यांनी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याकरिता केलेल्या उपाययोजनांचा तपशील | |
| ५ | आदर्श आचारसंहितेच्या भंगासंदर्भात गंभीर तक्रारी आल्या असल्यास त्याचा थोडक्यात तपशील व परवानगी न घेता प्रचारफेरी, मिरवणूक, प्रचार सभा झाल्या का ? झाल्या असल्यास त्यावर काय कार्यवाही करण्यात आली ? | |
| ६ | प्रचार कालावधीत "सोशल मिडीया सेल" स्थापन करुन सोशल मिडीयाद्वारे केल्या जाणाऱ्या प्रचाराची तपासणी व कारवाई होत आहे काय ? याबाबत तक्रारीची तालुकानिहाय संख्या नमूद करावी ? | |
| ७ | पेड न्यूजसंबंधात यंत्रणा कार्यान्वित आहे काय? वर्तमानपत्रातील बातम्यांची तपासणी झाली आहे किंवा कसे ? अशा बातम्यांची संख्या | |
| ८ | दौऱ्यादरम्यान सार्वजनिक मालमत्तेवर प्रचार साहित्य लावलेले आढळून आले काय ? असल्यास कार्यवाही संदर्भात दिलेल्या सूचना व केलेल्या कार्यवाहीचा तपशिल नमूद करावा. | |
| ९ | आचारसंहिता भंगाच्या किती तक्रारी निवडणूक निरीक्षक या नात्याने आपल्याकडे प्राप्त झाल्या का? याबाबत आपण केलेल्या कार्यवाहीचा थोडक्यात अहवाल. | |
| १० | मतमोजणी केंद्र, स्ट्रॉंगरुम, मतदान साहित्य वाटप व स्विकार केंद्र, इ. ची व्यवस्था काय असेल याचा आढावा घेतला काय? | |

| अ.क्र. | विषय | निवडणूक निरीक्षकांचा अहवाल | | |
|---|---|---|---|---|
| | मतदानाची पूर्वतयारी संदर्भात | सदस्य जिप/पंस. | सदस्य (न.प./न.पं) | अध्यक्ष (न.प थेट) |
| १ | मतदान यंत्रे तयार करण्याच्या प्रक्रियेची तपासणी | | | |
| २ | मतदान यंत्रे मतपत्रिका लावून तयार करण्याचे स्थळ | | | |
| ३ | मतदान यंत्रे तयार करण्यासाठी राजकीय/मतदान प्रतिनिधी उपस्थित होते काय ? असल्यास दोन प्रतिनिधींची नावे, पक्ष व मोबाईल क्रमांक नमूद करावीत. | | | |
| ४ | तयार केलेल्या मतदान यंत्राची सिलींग प्रक्रिया व्यवस्थित पार पाडली आहे काय ? मतदान केंद्रनिहाय तयार करण्यात आलेल्या मतदान केंद्राबाबतची नोंद विशेष रजिस्टरमध्ये ठेवण्यात आली आहे का ? | | | |
| ५ | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी १०% मतदान यंत्रे स्वत: तपासली आहेत काय ? | | | |
| ६ | निवडणूक निरीक्षक यांनी कोणत्याही ५ मतदान यंत्रांची (Random checking) तपासणी करुन ती व्यवस्थित काम करीत असल्याबाबत अहवाल द्यावा. | | | |
| ७ | (i) एकूण मतदान केंद्रांची संख्या<br>(ii) प्रत्यक्ष वापरात येणाऱ्या मतदान यंत्रांची संख्या (CU व BU)<br>तक्रारी / आचारसंहिता उल्लंघन / कायदा व सुव्यवस्था इत्यादी प्रसंग हाताळण्याबाबतचे मार्गदर्शन, इत्यादी | | | |

दिनांक:

ठिकाण :

निवडणूक निरीक्षकांची सही

मतदानाचा दिनांक- .................
प्रचार कालावधी - दि. .......... ते दि. .........
भेटीचा कालावधी - दि. .......... ते दि. ..........
रात्री मक्काम दिनांक- ......................

# परिशिष्ट-५

## निवडणूक निरीक्षक यांचा तिसरा अहवाल

(मतदान व मतमोजणी संपन्न झाल्यानंतरचा अहवाल)

नगर परिषद/नगर पंचायत/जिल्हा परिषद/पंचायत समितीचे नाव :
निवडणूक निरीक्षकाचे नाव :
भ्रमणध्वनी क्रमांक :
छाननीचा दिनांक:

| अ. क्र. | विषय | निवडणूक निरीक्षकांचा अहवाल | | |
|---|---|---|---|---|
| | मतदानाचा दिवस | सदस्य जिप/पंस. | सदस्य (न.प./न.पं) | अध्यक्ष (न.प थेट) |
| १ | मतदानाच्यादिवशी कोणकोणत्या मतदान केंद्रांना भेटी दिल्या ? | | | |
| २ | मतदान केंद्रावर मतदारांसाठी सर्व सोई-सुविधा उपलब्ध होत्या किंवा कसे ? उदा :-<br>(i) रॅम्प<br>(ii) पिण्याचे पाणी<br>(iii) प्रसाधनगृहे, इत्यादी. | | | |
| ३ | (i) मतदान केंद्रावर उमेदवारांचे मतदान प्रतिनिधी होते का ?<br>(ii) मतदान सुरु होण्यापुर्वी मॉकपोल घेण्यात आला होता वा कसे, (मतदान केंद्राध्यक्षाचे घोषणापत्र तपासून)<br>(iii) मतदान केंद्रावर रांगा होत्या किंवा कसे ?<br>(iv) मतदान केंद्रावर पुरेशा प्रमाणात पोलीस बळ उपलब्ध होते का ?<br>(v) मतदान यंत्रे सुरळीत सुरु होती किंवा कसे, मतदान यंत्र बदलण्यात आल्यासंदर्भातील घटना | | | |
| ४ | (i) मतदानादरम्यान एखादी गंभीर तक्रार आली असल्यास त्याचा थोडक्यात तपशील<br>(ii) भेटीच्यावेळी कोणकोणते झोनल अधिकारी भेटले ? | | | |
| ५ | मतदान प्रक्रिया संपल्यानंतर उपस्थित असणाऱ्या स्वीकार केंद्राचा तपशिल, सर्व मतदान केंद्रावरील मतदान साहित्य स्वीकार केंद्रावर सुरक्षित प्राप्त झाले किंवा कसे ? | | | |
| ६ | मतदान यंत्रे ठेवण्याची स्ट्रॉंग रुम सुस्थितीत असल्याबाबत खात्री केली आहे काय ? | | | |
| ७ | राजकीय प्रतिनिधींसमोर स्ट्रॉंग रुममध्ये मतदान यंत्रे ठेवली गेली काय? | | | |
| ८ | यावेळी उपस्थितीत २ प्रतिनिधींची नावे, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावेत. | | | |

| अ. क्र. | विषय<br>मतमोजणी | निवडणूक निरीक्षकांचा अहवाल | | |
|---|---|---|---|---|
| | | सदस्य जिप/पंस. | सदस्य (न.प./न.पं) | अध्यक्ष (न.प थेट) |
| १ | (i) मतमोजणीच्यावेळी कोणकोणत्या मतमोजणी केंद्रांना भेटी दिल्या ?<br>(ii) मतमोजणीच्या ठिकाणी किती टेबल लावण्यात आली होती ?<br>(iii) निकाल पत्रकारांना मिळण्याकरिता सुविधा होती का ? | | | |
| २ | सर्व मतमोजणी केंद्रावरील मतमोजणी प्रक्रिया योग्यरित्या पार पाडण्यात आली किंवा कसे ? | | | |
| ३ | मतमोजणी सुरु झाल्यानंतर तहकूब करावी लागल्यास त्यासंदर्भातील घटना | | | |
| ४ | मतमोजणी दरम्यान एखादी गंभीर तक्रार आली असल्यास त्याचा थोडक्यात तपशील | | | |
| ५ | मतमोजणीवेळी झालेल्या मतदानाच्या आकडेवारीत तफावत आढळल्याच्या घटना व त्याचा तपशील | | | |
| ६ | मतमोजणीनंतर काढता येणाऱ्या मेमरी कोषागारात ठेवण्याकरिता करण्यात आलेली व्यवस्था. | | | |

दिनांक:

ठिकाण : निवडणूक निरीक्षकांची सही